# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**

**मंगळवार, दिनांक १६ एप्रिल, २०१३**

**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ) अल्पसूचना प्रश्न**

(१) **"विलेपार्ले (मुंबई) येथे एका तरुणीवर सामुहिक बलात्कार केल्याची घटना"** या विषयावरील श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा अल्पसूचना प्रश्न क्र.१०८११९.

(२) **"उदगीर (जि.लातूर) उद्यगीरी किल्यावरील भगवा ध्वज काही समाजकंटकांनी हटवून त्या ठिकाणी हिरवा झेंडा लावल्याची घटना"** या विषयावरील श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा अल्पसूचना प्रश्न क्र.१०८१७३.

**(ब) तारांकित प्रश्न.**

**(क) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे :-**

**सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** : **"शासनाने राज्यातील शासकीय रुग्णालयातील रोगनिदान सेवांचे खाजगीकरण करण्याचा घेतलेला निर्णय"** या विषयावरील श्री.एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) व इतर वि.स.स. यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ५९००८ ला दिनांक १६ डिसेंबर, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **मुख्यमंत्री** : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उद्योग मंत्री** : (क) महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा चौतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(३) जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** :

(क) महाराष्ट्र सिंचन विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा वार्षिक अहवाल व परिसमापकांचा अंतिम अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र भूविकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २००८-२००९, २००९-२०१० व २०१०-२०११ या वर्षांचा वार्षिक अहवाल व ताळेबंद - नफा तोटा पत्रक सभागृहासमोर ठेवतील.

**(४) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** :

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांचे सन २०१०-२०११ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(५) महिला व बाल विकास मंत्री** :

महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचा सन २००९-२०१० या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : समिती प्रमुख, विधानसभा विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव :-**

विधानसभा विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

**(१)** सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.नाना पटोले व श्री.जितेंद्र आव्हाड यांनी "लेक लाडकी" अभियानाच्या प्रवर्तक ॲड.वर्षा देशपांडे यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण.

**(२)** सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.भारत भालके यांनी श्री.राजेश प्रधान, जिल्हा पोलीस अधीक्षक, सोलापूर यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण.

या दोन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचे अहवाल सादर करण्याकरिता म.वि.स. नियम १८३(१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

**चार : अंदाज समितीचा एकोणतिसावा व तिसावा अहवाल सादर करणे.**

**पाच : पंचायती राज समितीचा तेरावा व चौदावा अहवाल सादर करणे.**

**सहा : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा पाचवा व सहावा अहवाल सादर करणे.**

**सात : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).**

**आठ : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**नऊ : औचित्याचे मुद्दे - (असल्यास).**

**दहा : शासकीय विधेयक :-**

**पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१३.

**अकरा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(दिनांक २५ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना-क्रमांक १)**

(१) **सर्वश्री बापूसाहेब पठारे,** विलास लांडे, जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"पुणे शहरात म्हाडाच्या अनेक इमारती धोकादायक अवस्थेत असणे, धोकादायक अवस्थेत असलेल्या इमारतींमध्ये हजारो कुटुंबांचे वास्तव्य असणे, मुंबईप्रमाणे पुणे शहरातील म्हाडा वसाहतीसाठी सन २०११ मध्ये २.५ एफ.एस.आय. मंजूर करण्यात आलेला असतानाही अद्यापपर्यंत सदर एफ.एस.आय.चे वाटप करण्यात आलेले नसणे, तसेच नियमावली तयार करण्यात आलेली नसणे, येथील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.गृहनिर्माण राज्यमंत्री यांचेकडे वारंवार मागणी केलेली असतानाही म्हाडा प्रशासनाकडून हेतुपुरस्सर अडथळा निर्माण केला जात असणे, पुण्यात असलेल्या म्हाडा वसाहतीतील सोसायट्यांचा कन्व्हेयन्स देण्यास म्हाडा कार्यालयाकडून विलंब होत असल्याने पुनर्विकासाअभावी येथील अनेक इमारती मोडकळीस आलेल्या असणे, म्हाडा वसाहतींचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चाललेला असणे, परिणामी म्हाडा वसाहतीतील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, मोडकळीस आलेल्या इमारतींमुळे रहिवाशांची सुरक्षितता धोक्यात आलेली असल्याने याबाबत सखोल चौकशी करुन म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास करणेबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(दिनांक १० एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना -क्रमांक २ ते ४ )**

(२) **सर्वश्री मंगल प्रभात लोढा,** गोपाळ शेट्टी, योगेश सागर, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मुंबईतील नागरिकांना आधारभूत सेवा-सुविधांपासून मोठया प्रमाणावर वंचित रहावे लागत असल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, मोठया प्रमाणावर वाढणाऱ्या असुविधेमुळे मुंबईतील लाखो लोकांना विविध प्रकारचा त्रास होणे, सार्वजनिक सुविधा अपुऱ्या पडत असल्याने वीज, पाणी, रस्ते या सर्व सुविधांवर अतिरिक्त भार पडणे, परिणामी संपूर्ण शहरातील वाहतुकीचे प्रमाण वाढल्याने वाहतुक कोंडी निर्माण होऊन जनजीवन विस्कळीत होणे, त्यामुळे मुंबई शहरासाठी शासनाने आधारभूत सेवा-सुविधा मुबलक प्रमाणात उपलब्ध करून दिल्यास तसेच हाजीअली ते नरिमन पॉईंट सी लिंक, मेट्रो आणि मोनो रेल तातडीने सुरू केल्यास मुंबईचा विकास होऊन मुंबईच्या दयनीय स्थितीमध्ये फरक पडण्याची शक्यता निर्माण होणे, परंतु सोयी-सुविधांकडे शासनाने केलेल्या अक्षम्य दुर्लक्षामुळे जनतेमध्ये शासनाविषयी निर्माण झालेला तीव्र स्वरूपाचा असंतोष, त्यामुळे शासनाने मुंबई शहराकरिता तातडीने दहा हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री.आर.एम.वाणी,** श्रीमती मीरा रेंगे-पाटील, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण** मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-

"सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील ९०८८ खतमिश्रीत गव्हाचा साठा महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ जाधववाडी औरंगाबाद येथे एक वर्षापासून पडून असणे, औरंगाबाद जिल्ह्यात स्वस्त धान्य दुकानांमध्ये खतमिश्रित गव्हाचा साठा वितरीत होत असल्याच्या तक्रारी करण्यात येणे, औरंगाबाद जिल्ह्यामध्ये अत्यल्प पावसामुळे दुष्काळ असणे, खतमिश्रित गव्हाचा साठा वितरीत होत असल्याच्या चौकशीची मागणी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, अन्न व औषध प्रशासन यांच्याकडे लोकप्रतिनिधी यांनी करणे, विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी तपासणी करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सहायक आयुक्त, अन्न व औषधे प्रशासन, जिल्हा पुरवठा अधिकारी, सहायक लेखाधिकारी, जिल्हा लेखा परीक्षक अधिकारी अशा पाच जणांची संयुक्त समिती गठीत करणे, संयुक्त समितीने दिनांक १३ सप्टेंबर, २०१२ रोजी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, जाधववाडी, औरंगाबाद येथे तपासणी करणे, तपासणीमध्ये गोदाम क्रमांक ५, ७ व १० मध्ये ९०८८ गव्हाच्या पोत्यांमध्ये मोठ्या प्रमाणात खतमिश्रित गव्हाचा साठा आढळून येणे, गोदाम क्रमांक ५, ७ व १० मध्ये ९०८८ खतमिश्रित गव्हाचा साठा संयुक्त समितीने सील करणे, सदर गव्हाच्या साठ्यामधील २९ गव्हाचे नमुने पुणे येथे प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविणे, समितीने दिनांक १४ सप्टेंबर, २०१२ रोजी गोदाम क्रमांक ५, ७ व १० मधील ९०८८ गव्हाच्या पोत्यांमध्ये युरिया, अमोनिया, फॉस्फेट व फॉरेन मॅटर आढळून आल्यामुळे हा सर्व धान्याचा साठा मानवास खाण्यास अयोग्य असून सदर साठा नष्ट करण्याबाबत कळविणे, ९०८८ पोती गव्हाचा साठा नष्ट न करता त्याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करणे, ९०८८ दूषित रासायनिक गव्हाचा साठा गोदामात पडून असल्यामुळे चांगल्या गव्हाचा साठा साठवणुकीसाठी अडचणी येणे, लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी संबंधित दोषींवर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याबाबत अन्न व औषधे प्रशासन विभाग यांना कळविणे, परंतु त्यांनी याकडे दुर्लक्ष करणे, औरंगाबाद माल धक्क्यावर चांगल्या गव्हामध्ये युरिया मिश्रित

केल्यामुळे धान्याच्या नुकसानीच्या वसुलीचे आदेश अन्न महामंडळ यांनी देणे, मानवास खाण्यास अयोग्य असा दूषित रासायनिक ९०८८ पोती गव्हाचा साठा वितरित करण्यासाठी संबंधितांवर दबाव टाकणे, त्यामुळे औरंगाबाद जिल्ह्यातील सामान्य जनतेचा जीव धोक्यात येणे, धान्याचा साठा खतमिश्रित व मानवास खाण्यास अयोग्य केल्यामुळे अन्नधान्याच्या वाहतुकीमध्ये दोषी वाहतूक ठेकेदाराला धान्याच्या कामात प्रतिबंध घालण्याकडे दुर्लक्ष करणे, याबाबत शासनाने तातडीने दोषींवर करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(४) **सर्वश्री विक्रमसिंह पाटणकर,** शशिकांत शिंदे, बाळासाहेब पाटील, दिपक चव्हाण, मकरंद पाटील, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुर्नवसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"हिंदू वारसा कायद्याप्रमाणे वडिलोपार्जित मिळकतीमध्ये भावाबरोबर बहिणींना समान हक्क मिळणे, त्यानुसार प्रकल्पबाधित व्यक्तीच्या व्याख्येमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळाने घेऊनसुध्दा प्रस्ताव प्रलंबित असणे, तसेच प्रकल्पग्रस्तांच्या इतर मागण्यांबाबत मा.मुख्यमंत्र्यांसमवेत दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ रोजी श्रमिक मुक्तीदलासोबत झालेली चर्चा, धरणग्रस्तांच्या मागण्यांबाबत त्वरित निर्णय घेण्याच्या सूचना मा.मुख्यमंत्री यांनी देऊनसुध्दा अधिकाऱ्यांनी त्यावर अद्यापही निर्णय न घेणे, त्यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, प्रकल्पग्रस्तांनी दिनांक ११ एप्रिल, २०१३ पासून राज्यव्यापी आंदोलन करण्याचा घेतलेला निर्णय, या आधी दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ रोजी प्रकल्पग्रस्तांनी, मा.मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार सुरू असलेले आंदोलन स्थगित करणे, प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांवर त्वरित निर्णय घेण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री प्रशांत ठाकूर,** भाऊसाहेब कांबळे, मधु चव्हाण, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"नवी मुंबईतील जागा सिडकोने संपादन करुन लोकांना घरे देताना काही ठिकाणी सिडकोने स्वत: विकासक म्हणून कामे केलेली असून काही भूखंड निविदा काढून बांधकाम व्यावसायिकांना लीजवर दिले असणे, स्थानिक शेतकऱ्यांना १२.५ टक्के योजनेनुसार भूखंडाचे वाटप केलेले असल्याने अशा भूखंडावर बांधलेल्या इमारतीमधील सदनिका किंवा गाळेधारकांनी त्यांच्या सदनिका विक्री केल्यानंतर खरेदीदारांच्या नावे सदनिका किंवा गाळा करताना सिडकोकडून हस्तांतरण शुल्क आकारले जाणे, कारण सिडकोने निविदा काढून बांधकाम व्यावसायिकांना लीजवर व स्थानिक शेतकऱ्यांना १२.५ टक्के योजनेनुसार भूखंडाचे वाटप केलेले असणे, या भूखंडावर बांधलेल्या इमारतीतील सदनिका संबंधित व्यावसायिकांनी मालकी तत्त्वावर विकलेल्या असल्याने या सदनिकांच्या विक्री अथवा फेरविक्रीसाठी कोणत्याही परिस्थितीत सिडकोची परवानगी अथवा हस्तांतरण शुल्क सिडकोला देण्याची कोणतीही तरतूद नसल्याने तसेच दि न्यू बॉम्बे डिस्पोजल ॲन्ड रेग्युलेशन, १९७५ किंवा दि न्यू बॉम्बे डिस्पोजल ऑफ लॅन्ड (अमेंडमेंट) रेग्युलेशन, २००८ या दोन्ही नियमावलीमध्ये तसे नमूद नसल्याने अशा सदनिकांच्या विक्री, फेर विक्री किंवा हस्तांतरणासाठी सिडकोचे ना हरकत प्रमाणपत्र देण्याचा किंवा हस्तांतरण शुल्क वसूल

करण्याचा कोणताही कायदेशीर आधार वा अधिकार सिडकोला नसणे, असे असताना भूखंडावर असलेल्या सदनिका अथवा गाळे विक्री केल्यानंतर खरेदीदारांच्या नावे करताना सिडको जे हस्तांतरण शुल्क आकारते हा नागरिकांना भुर्दंड असणे, ज्या जागेची मालकी सिडकोने दीर्घ मुदतीसाठी हस्तांतरीत केली आहे, त्या जागेवरील पुनर्विक्री करताना सिडकोने हस्तांतरण शुल्क घेणे हे नागरिकांवर अन्यायकारक असल्याने नागरिकांत पसरलेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने त्वरित चौकशी करुन अशा स्वरुपाची अन्यायकारक केली जाणारी शुल्क आकारणी रद्द करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(६) **सर्वश्री सूर्यकांत दळवी,** एकनाथ शिंदे, भरतशेठ गोगावले, प्रताप सरनाईक, विनोद घोसाळकर, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"रत्नागिरी जिल्हयातील दापोली, खेड तालुक्यात मनिषा कन्स्ट्रक्शन कंपनीमार्फत रस्त्याच्या निकृष्ट दर्जाची व अत्यंत मंदगतीने सुरू असलेल्या कामासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी सातत्याने विविध आयुधांद्वारे सदर बाब शासनाच्या निदर्शनास आणूनही अद्याप कोणतीही कार्यवाही न होणे, यापूर्वीही ग्रामसडक योजनेमधून निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे शासनाने ठेका रद्द करण्याचा घेतलेला निर्णय, सदर रस्त्यांची कामे घेताना निविदा भरताना खरी माहिती लपवून शासनाची दिशाभूल करणे, शासनाकडून कामाची निविदा मंजूर करून घेतल्यानंतर सदरचे काम अन्य व्यक्तीस देऊन त्यांच्याकडून कमिशन घेणे, सदर कामांचे ठेके घेताना अधिकाऱ्यांना धमकावून ठेका देण्यास भाग पाडणे, मे.मनिषा कन्स्ट्रक्शन हे शासनाचे नोंदणीकृत कंत्राटदार असूनही गत ५ वर्षात शासनाच्या विरोधात न्यायालयीन खटला दाखल केला असणे, अशा प्रकारे पुणे, रत्नागिरी, धुळे, नाशिक, संगमनेर इत्यादी ठिकाणी खटला दाखल असणे, उपरोक्त मे.मनिषा कन्स्ट्रक्शन कंपनीच्या कामाची सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले जाणिवपूर्वक दुर्लक्ष, या प्रकरणी शासनाने दोषी असलेल्या मे.मनिषा कन्स्ट्रक्शनची नोंदणी रद्द करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**बारा : लक्षवेधी सुचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे :-**

**शालेय शिक्षण मंत्री** : **"सन २००६-२००७ अखेरीस सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत खर्च न करण्यात आलेला निधी."** या विषयावरील तत्कालीन विधानसभा सदस्य श्री.अमरसिंह पंडित व इतर वि.स.स. यांच्या दिनांक ११ मार्च, २००८ रोजी उत्तरित झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील प्रश्नोत्तरांदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर )**

तेरा : **सर्वश्री शशिकांत शिंदे, मधु चव्हाण, किसन कथोरे, सुरेश धस, जीतेंद्र आव्हाड, कृष्णा हेगडे, हनुमंत डोळस, सुभाष झनक, सुभाष धोटे, दीनानाथ पडोळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"राज्यात श्रम करणाऱ्या मेहनती कामगारांना न्याय व त्यांच्या कामाला योग्य मोबदला देण्यात महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर असणे, परंतु राज्यात कामगारांसाठी असलेले कायदे कामगारांना न्याय देण्यात कमी पडत असून शासनाचा दृष्टीकोनसुध्दा उदासीन असणे, त्यामुळे पुन्हा भांडवलशाही उदयास येत असल्याची व्यक्त होत असलेली भीती, कामगारांना संरक्षण देण्याची आवश्यकता, कारखानदार शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरून गुंड प्रवृत्तीच्या लोकांमार्फत कामागारांवर अन्याय करीत असणे, आपल्या न्याय्य हक्कांसाठी लढणाऱ्या कामगारांना होत असलेली मारहाण, पोलिसांतर्फे त्यांना योग्य ते संरक्षण मिळत नसणे, १९६९ च्या कामगार कायद्यात दुरूस्ती करून कामगारांच्या हिताचे कायदे करण्याची आवश्यकता, कंत्राटी कामगार कायद्यात सुधारणा करून उत्पादन प्रक्रियेत व कायमस्वरूपी कामात कंत्राट पध्दतीस प्रतिबंध करून २४० दिवस सलग जे कामगार कंत्राटी पध्दतीवर काम करीत आहेत त्या कामगारांना ते कंपनी सेवेतील कायम कामगार म्हणून संबोधित करण्याची आवश्यकता, राज्यात कामगार न्यायालयांची संख्या कमी असणे, त्यामुळे मोठया प्रमाणात खटले प्रलंबित राहणे, त्यामुळे कामगारांना न्याय मिळण्यात होत असलेला विलंब, मालकधार्जिण्या नवीन संघटना तयार करून कामगार चळवळ मोडीत काढण्याचे हेतु:पुरस्सर होत असलेले प्रयत्न, राज्यातील राज्य कामगार विमा रूग्णालयांची सुरू असलेली दुरावस्था, या रूग्णालयात कामगारांना औषधे व इतर सुविधा न मिळणे, या रूग्णालयातील ५० टक्के डॉक्टरांच्या जागा रिक्त असणे, तेथील डॉक्टरांना पदोन्नतीपासून वंचित रहावे लागणे, बऱ्याच ठिकाणी तज्ञ डॉक्टर नसणे, त्यामुळे कामगार रूग्णांना योग्य उपचार न मिळणे, राज्यात उद्योगधंदे वाढीसाठी उद्योजकांना वीज, पाणी, जमिनी व इतर पायाभूत सुविधा सवलतीच्या दराने उपलब्ध करून दिल्यास जास्त प्रमाणात उद्योग राज्यात सुरू होऊन बेरोजगारीचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकेल, त्यासाठी प्रत्येक जिल्हयात एक झोन उभारून उद्योजकांना आकृष्ट करण्याची आवश्यकता, मागास भागातील जिल्हयात असे झोन उभारण्याची होत असलेली मागणी, राज्यातील औद्योगिक वसाहतींची झालेली दुरावस्था, तेथील बरेच उद्योग बंद असणे, बंद असलेल्या उद्योगातील यंत्रसामुग्रीच्या होत असलेल्या चोऱ्या, त्याकडे पोलिसांचे होत असलेले दुर्लक्ष, राज्यातील कामगार दुर्लक्षित असणे, कामगारांची पिळवणूक होत असणे, कामगारांविरूध्द बनावट तक्रारी दाखल करून त्यांना कामगार चळवळीपासून दूर ठेवण्याचा जाणिवपूर्वक करण्यात येत असलेला प्रयत्न, कामगारांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देऊन त्यांची होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी धोरण जाहीर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

चौदा : **शासकीय विधेयके :-**

**(अ) विधानपरिषदेने सुधारणांसह संमत केल्याप्रमाणे विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

(क) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री देवेंद्र फडणवीस, एकनाथराव खडसे (पाटील), महादेव**

**बाबर, सुधीर मुनगंटीवार, सुरेश हाळवणकर, चंद्रशेखर बावनकुळे, विवेक पाटील, श्रीमती मीनाक्षी पाटील, सर्वश्री धैर्यशील पाटील, गणपतराव देशमुख, गोपाळ शेट्टी, सुधाकर भालेराव, श्रीमती पंकजा मुंडे-पालवे, सर्वश्री संजय भेगडे, गिरीश बापट, श्रीमती माधुरी मिसाळ, भिमराव तापकीर, डॉ.खुशाल बोपचे, प्रमोद जठार, रविंद्र चव्हाण, नानाजी शामकुळे, अबू आजमी, योगेश सागर, प्रकाश शेंडगे, रविंद्र वायकर, विनोद घोसाळकर, प्रकाश (बाळा) सावंत, भरतशेठ गोगावले, सुर्यकांत दळवी, सदानंद चव्हाण, शरद पाटील, राजेश क्षीरसागर, चंद्रदिप नरके, डॉ.सुजित मिणचेकर, श्री. चिमणराव पाटील, श्रीमती मिराताई रेंग-पाटील, सर्वश्री चंद्रकांत मोकाटे, विजय शिवतारे, अनिल कदम, धनराज महाले, प्रताप सरनाईक, एकनाथ शिंदे, रुपेश म्हात्रे, राजन विचारे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री विजयराज शिंदे, संतोष सांबरे, संजय जाधव, आर.एम.वाणी, सुभाष देसाई, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०१३ नापसंत करते."

(ख) **सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, कॅ.अभिजीत अडसूळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री विजय शिवतारे, चंद्रकांत मोकाटे, विजय औटी, अनिल राठोड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राजेश क्षीरसागर, डॉ.सुजीत मिणचेकर, चंद्रदीप नरके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री प्रकाश (बाळा) सावंत, चिमणराव पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री बबनराव घोलप, धनराज महाले, अनिल कदम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १०० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(झ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री सुर्यकांत दळवी, सदानंद चव्हाण, भरतशेठ गोगावले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ८१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ट) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संतोष साबंरे, श्रीमती मिरा रेंगे-पाटील, सर्वश्री संजय शिरसाठ, आर.एम.वाणी, ज्ञानराज चौगुले, ओमप्रकाश भुपालसिंह उर्फ राजेनिंबाळकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ठ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विजयराज शिंदे, डॉ.संजय रायमुलकर, कॅ.अभिजीत अडसुळ, श्री.अशोक शिंदे, ॲड.आशिष जयस्वाल, सर्वश्री नरेंद्र भोंडेकर, संजय राठोड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(१)** सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१३.

(क) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री गोपाळ शेट्टी, योगेश सागर, प्रकाश महेता, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री सुभाष देसाई, महादेव बाबर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.प्रकाश शेंडगे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१९ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विवेक पंडीत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ९९ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३.

(क) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, दादाराव केचे, अतुल देशकर, विजयकुमार देशमुख, संजय राठोड, गोपाळ शेट्टी, योगेश सागर, प्रकाश महेता, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.महादेव बाबर, वि.स.स. यांचा प्रस्तावः-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.गिरीश बापट, श्रीमती माधुरी मिसाळ, श्री.भिमराव तापकीर, वि.स.स. यांचा प्रस्तावः-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.प्रकाश शेंडगे, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुरेश हाळवणकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २२० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विवेक पंडित, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १११ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(झ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विवेक पाटील, श्रीमती मीनाक्षी पाटील, श्री. धैर्यशील पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(क) विधानपरिषदेने संमत केल्यास, विचार, खंडश: विचार व संमत करणे -**

(क) **सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री विजय शिवतारे, चंद्रकांत मोकाटे, विजय औटी, अनिल राठोड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राजेश क्षीरसागर, डॉ.सुजीत मिणचेकर, चंद्रदीप नरके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री प्रकाश (बाळा) सावंत, चिमणराव पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री बबनराव घोलप, धनराज महाले, अनिल कदम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १०० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री सुर्यकांत दळवी, सदानंद चव्हाण, भरतशेठ गोगावले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ८१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(झ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संतोष साबंरे, श्रीमती मिरा रेंगे-पाटील, सर्वश्री संजय शिरसाठ, आर.एम.वाणी, ज्ञानराज चौगुले, ओमप्रकाश भुपालसिंह उर्फ राजेनिंबाळकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ट) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विजयराज शिंदे, डॉ.संजय रायमुलकर, कॅ.अभिजीत अडसुळ, श्री.अशोक शिंदे, ॲड.आशिष जयस्वाल, सर्वश्री नरेंद्र भोंडेकर, संजय राठोड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**पंधरा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार दिनांक २ एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते १२)**

**(१) श्री.एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील), वि.स.स.**

**"नागपूर शहरात चोरी खुन, दरोडा, घरफोडी,चैनस्नेचींग या सारख्या प्रकरणांमध्ये वाढ झाल्याबाबत"** या विषयावरील **श्री.देवेंद्र फडणवीस व इतर वि.स.स.** यांच्या दिनांक १९ डिसेंबर, २०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ४९६ मधील प्रश्न क्रमांक ७०७०५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री. गोपाळ शेट्टी, वि.स.स.**

**"नागपूर शहरातील विकास योजनेतील हरितपट्टयातील अंतर्गत असलेले भूखंड गुंठेवारी अधिनियम, २००१ नुसार कार्यवाही करण्याबाबत"** या विषयावरील **श्री.देवेंद्र फडणवीस व इतर वि.स.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १०१६२३ ला दिनांक १२ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(३) श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.**

**"महावीज निर्मिती कंपनीस निकृष्ट दर्जाचा कोळसा पुरविण्यात येत असल्याबाबत"** या विषयावरील **श्री.चंद्रशेखर बावनकुळे व इतर वि.स.स.** यांच्या दिनांक १३ डिसेंबर, २०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ४५० मधील प्रश्न क्रमांक ८१४७५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(४) **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

**"अपंगांच्या कल्याणासाठी राज्य शासनाने तयार केलेल्या अपंग विकास कृती आराखड्यासाठी केलेल्या तरतुदीची अंमलबजावणी केली नसल्याबाबत"** या विषयावरील **श्री.अमीन पटेल व इतर वि.स.स.** यांचा दिनांक २० जुलै, २०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४१६ मधील प्रश्न क्रमांक ६७५१५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(५) **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

**"चंद्रपूर जिल्ह्यातील हुमन नदी प्रकल्पाच्या नेट प्रेझेंट व्हॅल्युच्या रकमेमध्ये वाढ झाल्याबाबत"** या विषयावरील **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७९३८१ ला दिनांक २५ जुलै, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(६) **डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.**

**"राज्यातील भूविकास बँकेच्या कर्मचाऱ्यांना अनेक महिने पगार व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युइटी व इतर देणी मिळाली नसल्याबाबत"** या विषयावरील **श्री.अशोक पवार व इतर वि.स.स.** यांचा दिनांक २१ डिसेंबर, २०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ५१८ मधील प्रश्न क्रमांक ७८६०३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(७) **श्री.सरदार तारासिंग, वि.स.स.**

**"राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी काढलेला मोर्चा"** या विषयावरील **श्री.जितेंद्र आव्हाड व इतर वि.स.स.** यांचा दिनांक २१ डिसेंबर,२०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ५१९ मधील प्रश्न क्रमांक ७९७०० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(८) **श्री.सुधाकर देशमुख, वि.स.स.**

**"मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरांबाबत"** या विषयावरील **श्री.योगेश सागर, वि.स.स.** यांचा दिनांक १३ डिसेंबर,२०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ४६८ मधील प्रश्न क्रमांक ८४९६४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(९) **श्री.गोवर्धन शर्मा, वि.स.स.**

"**राज्यातील महामार्गावरील टोल वसुलीतून जनतेची लूट होत असल्याबाबत**" या विषयावरील **श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.** यांचा दिनांक २१ डिसेंबर, २०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ५१२ मधील प्रश्न क्रमांक ८४९८६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(१०) **श्री.राजन विचारे, वि.स.स.**

"**ठाणे जांभळीनाका येथे रिकाम्या असलेल्या जागेत फेरीवाल्यांनी अनधिकृतपणे केलेले अतिक्रमण**" या विषयावरील **श्री.राजन विचारे व इतर वि.स.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १००७२० ला दिनांक १९ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(११) **श्री.उमाजी बोरसे, वि.स.स.**

"**राज्यात जकात कर रद्द करुन त्याऐवजी स्थानिक स्वराज्य संस्था कर लागू करण्याबाबत**" या विषयावरील **श्री.विलास लांडे व इतर वि.स.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ९८०६७ ला दिनांक २६ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(१२) **श्री.एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील), वि.स.स.**

"**नागपूर शहरातील मौजा सोमलवाडा येथील मिलिंद गृहनिर्माण सहकारी संस्था येथील भूखंडधारकांना अधिग्रहणाचा खर्च व इतर खर्चाची प्रतिपूर्ती करण्याबाबत**" या विषयावरील **श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १०१६२८ ला दिनांक २ एप्रिल, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(सोमवार, दिनांक १५ एप्रिल, २०१३ रोजीच्या बॅलेटद्वारे ठरविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १३ व १४)**

(१३) **श्री.रविंद्र चव्हाण, वि.स.स.**

"**मोझरी अमरावती येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्म शताब्दी निमित्त मुलभूत सुविधा निर्माण करण्याबाबत**" या विषयावरील **कॅप्टन अभिजीत अडसूळ, वि.स.स.** यांचा दिनांक १३ डिसेंबर, २०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ४७९ मधील प्रश्न क्रमांक ८३७२९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(१४) श्री.योगेश सागर, वि.स.स.**

**"चंद्रपूर जिल्ह्यातील सावली, नागभिड व सिंदेवाही तालुक्यात वाघाने ठार केलेल्या व्यक्तींना व जखमींच्या नातेवाईकांना वन विभागाने योग्य तो मोबदला न दिल्याबाबत"** या विषयावरील **श्री.अतुल देशकर,वि.स.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ९२९३१ ला दिनांक १९ डिसेंबर,२०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १५ एप्रिल, २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.